''मराठी कादंबरीत चित्रित झालेले धनगर समाजजीवन : एक विवेचक अभ्यास'' (निवडक कादंब-यांच्या आधारे)

- **प्रस्तावना :**

महाराष्ट्रात विविध जाती-जमातींचा रहिवास आहे. विविध प्रांत, जिल्हा व तालुक्यांत तसेच गावखेड्यांत अनेक जातिधर्मांचे लोक आपापले पारंपरिक व्यवसाय सांभाळून नव्या क्षेत्रातील नवनवीन व्यवसाय, उद्योग व व्यापारात प्रगती करत आहेत. त्याची दखल मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात कथा, कादंबरी, नाट्यवाङ्मयासह प्रवासवर्णनांतूनही घेतली गेली आहे आणि आजही साहित्यिक त्याची दखल कथा व कादंब-यांतून घेत आहेत.

मराठी कादंबरीतून धनगर समाजजीवनाचे चित्रण अत्यल्प आणि अभावानेच झाल्याचे आढळते. धनगर समाज अद्यापही ऊदरनिर्वाहासाठी वणवण भटकताना दिसतो. जुनाट चालीरीती, रूढी, परंपरांच्या विळख्यात गुरफटल्याने या समाजाचे मागासलेपण मोठ्या प्रमाणात वाढत गेले. या समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात यायला अनेक संकटे आणि अडचणींना सामोरे जावे लागले. प्रस्थापित आणि उच्चवर्गीय समाजाकडून धनगर समाजातील लोकांना तसेच मेंढपाळांना अवहेलनेने पाहिले गेले. रोज विविध ठिकाणी, डोंगरद-यांत शेळयामेंढ्यांच्या चा-यासाठी आपले बि-हाड हलवावे लागणा-या या समाजाची अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण याबरोबरच सामाजिक व राजकीय प्रगती झाली नाही. धनगर समाजाला विकासाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. म्हणूनच या समाजाचा चिकित्सक अभ्यास महत्त्वाचा वाटतो.

- **विषयनिवड :**

महाराष्ट्रात विविध प्रांतांतील धनगर जातीत जन्मलेल्या, जगलेल्या समाजाच्या समस्या, दुःख, व्यथा-वेदना, रूढी-परंपरांसह राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती समजावून

घेऊन त्यावर आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी व सर्वांगीण प्रगतीसाठी उपाययोजना करता यावी; शासनकर्त्यांचे लक्ष धनगर समाजाच्या उन्नती व विकासाकडे वळविता यावे, यासाठी हा विषय निवडणे महत्त्वपूर्ण व आवश्यक वाटले.

विविध कादंबरीकारांनी अनेकविध जाती-जमातींच्या समाजाचे प्रश्न, समस्या आणि त्यांची जीवनपद्धती 'कादंबरी' या मराठी वाङ्मयप्रकारात चित्रित करून त्या समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्न केले. त्या मानाने काही निवडक कादंबरीकारांनी आजपर्यंत प्रकाशित केलेल्या कादंबरी या साहित्यप्रकारातून धनगर समाजाच्या जीवनपद्धतींचे चित्रण केलेले आढळून आले. त्याचा अभ्यास विवेचनात्मकदृष्ट्या करता यावा व धनगर समाजातील कुप्रथा, कालबाह्य चालीरीती, रूढी व परंपरा, त्यांची संस्कृती व सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती समजून घेऊन त्यावर उपाययोजना करता यावी, यासाठी "मराठी कादंबरीत चित्रित झालेले धनगर समाजजीवन : एक विवेचक अभ्यास (निवडक कादंब-यांच्या आधारे)" या संशोधनविषयाची निकड भासली. प्रस्तुत संशोधनकार्यातून विषयाला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

माझा जन्म ग्रामीण भागात धनगर कुटुंबात झालेला असल्याने मला शालेय जीवनापासूनच मराठी साहित्यात, विशेषतः, कादंबरीत धनगर समाजजीवनाचे चित्रण कसे आले आहे, याविषयी जिज्ञासा आपसूक निर्माण झाली. म्हणूनच "मराठी कादंबरीत चित्रित झालेले धनगर समाजजीवन : एक विवेचक अभ्यास (निवडक कादंब-यांच्या आधारे)" हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी मार्गदर्शकांच्या संमतीने निवडलेला आहे.

- **गृहीतके :**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके मांडण्यात आलेली आहेत-

१) निवडक मराठी कादंब-यांत धनगर जमातीच्या संस्कृतीचे चित्रण आढळते.

२) सामाजिक प्रबोधन आणि मनोरंजनासाठी गजीनृत्य, हुईक, भाकणूक, एटान, धनगरी ओव्या, कवने, गीते आणि सुंबरान महत्त्वाची भूमिका बजावतात.

३) ऊदरनिर्वाहासाठी भटकंती अटळ असणा-या धनगर समाजाचा मूळ व्यवसाय मेंढीपालन आहे.

४) धनगरांनी लोकरीपासून घोंगड्या विणून वस्त्रोद्योगातही मोठे योगदान दिले.

५) धनगर समाजात शिक्षणाअभावी अंधश्रद्धा आणि अज्ञान दिसून येते.

६) अस्थिर व्यवसायामुळे धनगर समाजबांधवांवर लाचारीची वेळ येते. प्रसंगी उच्चवर्गीय प्रस्थापितांकडून अन्याय आणि अत्याचार सहन करावा लागतो.

७) धनगर समाजात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दुर्बलता दिसून येते.

८) चराऊ जमिनीकरिता गायरानाचे घटलेले क्षेत्र शेळी-मेंढीपालन व्यवसायास अडसर आणि समस्या ठरले आहे.

९) मेंढपाळ आणि धनगरांनी आधुनिक शेतीव्यवसाय स्वीकारलेला आहे.

१०) मेंढपाळ तसेच धनगर समाजाची आजची पिढी उच्चशिक्षणाकडे वाटचाल करीत आहे.

- **उद्दिष्टे :**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे मांडण्यात आलेली आहेत-

१) धनगर समाजाचे जीवनचित्रण आलेल्या कादंब-यांचा सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणे.

२) धनगर समाजातील व्यवहारकौशल्य, प्रामाणिकपणा, पारदर्शकता, तंत्रज्ञान, शास्त्र, भाषा, लिपी, ओव्या, गीते इत्यादी बाबींचा चिकित्सक अभ्यास करणे.

३) निवडलेल्या कादंब-यांत चित्रित झालेले धनगरांचे कौटुंबिक जीवन अभ्यासणे.

४) धनगर समाजाची गीते, ओव्या, कवने, सुंबरान, भाकणूक, हुईक, एटान, गजी नाच इत्यादी सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधनमाध्यमांचा अभ्यास करणे.

५) धनगर समाजाच्या विविध समस्यांच्या निवारणासाठी अभ्यासपूर्वक उपाययोजना सुचवणे.

६) धनगर समाजातील महत्त्वाच्या रूढी, परंपरांचा, प्रथांचा अभ्यास करणे.

७) निवडक कादंब-यांतील संवादभाषा, निवेदनभाषा, म्हणी आणि वाक्प्रचारांचा अभ्यास करणे.

८) मेंढपाळ तसेच धनगरांच्या जनावरांच्या चाराप्रश्नावर उपाययोजना शोधणे.

९) धनगर समाजातील वास्तव जीवन बारकाव्यांच्या तपशिलानिशी उलगडून दाखविणे.

१०) धनगर समाजातील दोन पिढ्यांचा सांस्कृतिक मूल्यसंघर्ष मांडणे.

११) धनगर समाजजीवनावर भौगोलिक स्थित्यंतरांचा होणारा परिणाम अभ्यासणे.

१२) उच्चवर्गीय प्रस्थापितांकडून धनगर तसेच मेंढपाळांचे होणा-या शोषणाचा शोध घेणे.

- **संशोधनाचे महत्त्व आणि गरज :**

भारत देशातील इतर काही राज्यांसह महाराष्ट्र राज्यात धनगर जमातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आढळते. शेळी-मेंढीपालन हा धनगरांचा अतिप्राचीन आणि पारंपरिक व्यवसाय होय. त्याचबरोबर काही प्रमाणात गाई-म्हशी व घोड्यांचेही पालन या समाजात केले जात होते. त्यामुळे या समाजाला सतत डोंगर-द-यांतून, रानावनांतून जित्राबांच्या अन्नपाण्यासाठी भटकत राहावे लागे. आजही बरेच धनगर शेळ्यामेंढ्या सांभाळण्याचे काम करतात; त्याचे चित्रण काही लेखकांनी कथा, कादंब-या व आत्मचरित्रांतून केलेले आहे. नवनाथ गोरे या मेंढपाळकुटुंबातील लेखकाने लिहिलेली ‘फेसाटी’ ही कादंबरी आज चर्चेत आहे. या कादंबरीला २०१८ चा ‘युवा साहित्य अकादेमी पुरस्कार’देखील प्राप्त झाला आहे. ‘बनगरवाडी’, ‘धनगरवाडा’, ‘दगा’, ‘बिरुबाचं चांगभलं’, ‘का धरिला परदेस’, ‘डोंगरापल्याड’, ‘मेंढका’ इत्यादी कादंब-यांतून धनगर समाजाचे जीवनचित्र रेखाटण्यात आलेले असून, ते प्रादेशिकतेप्रमाणे वेगवेगळे आहे. त्यांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. म्हणूनच या समाजाच्या सर्वांगीण अभ्यासासाठी या विषयाचे महत्त्व आणि गरज वाटते. आजही धनगर समाजातील पुरुष व स्त्रियांचे साक्षरता प्रमाण अत्यल्प आहे. या समाजातील काही लोक उच्चशिक्षित असूनही रोजगारापासून वंचित आहेत; त्यामागची कारणे शोधणे, व्यसनाधीन तरुणांना व्यसनमुक्त करणे, निरक्षरांना

शिक्षणासाठी प्रवृत्त करणे यासाठी मराठी कादंबरीतून आलेल्या धनगर समाजजीवनाचे चित्रण चिकित्सकपणे तसेच विवेचकपणे अभ्यासणे आवश्यक असल्याने निवडक उपलब्ध मराठी कादंब-यांत चित्रित झालेले धनगर समाजजीवनाचे चित्रण संशोधनाच्या नजरेतून पाहणे अत्यंत महत्त्वाचे वाटले. म्हणूनच ''मराठी कादंबरीत चित्रित झालेले धनगर समाजजीवन : एक विवेचक अभ्यास (निवडक कादंब-यांच्या आधारे)'' या विषयाची निवड सार्थ ठरते.

- **संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधनविषयाची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे.-

मेंढपाळ तसेच धनगरांच्या ऐतिहासिक, सामाजिक, व्यावसायिक आणि सांस्कृतिक लोकजीवनाचा अभ्यास ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आहे.

- **संशोधनाची मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनविषयाची मर्यादा खालीलप्रमाणे आहे.-

प्रस्तुत संशोधन हे केवळ निवडक कादंब-यांत चित्रित झालेल्या 'धनगर' समाजाच्या जीवनचित्रणापुरते मर्यादित आहे. मराठी भाषेतील केवळ 'कादंबरी' या साहित्यप्रकाराचाच अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन करताना काही साहित्याच्या अनुपलब्धतेमुळे काही मर्यादा येतील.

- **संशोधनपद्धती :**

प्रस्तुत संशोधनकार्य करताना वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, आस्वादात्मक, तुलनात्मक तसेच मूल्यमापनात्मक पद्धतींचा गरजेनुसार वापर करण्यात येणार आहे.

- **प्रकरणयोजना :**

  प्रकरण पहिले : मराठी कादंबरीचा उदय, स्वरूप आणि विकास

  प्रकरण दुसरे : महाराष्ट्रातील धनगर समाजाचे लोकजीवन

  प्रकरण तिसरे : निवडक मराठी कादंब-यांत चित्रित झालेले धनगर समाजजीवन

  प्रकरण चौथे : निवडक मराठी कादंब-यांची भाषाशैली

  प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि उपसंहार

  (संशोधनप्रक्रियेत प्रकरणे आणि निवडक कादंब□यांच्या संख्येत उपलब्धतेनुसार बदल होऊ शकतो.)

प्रकरण पहिले : **मराठी कादंबरीचा उदय, स्वरूप आणि विकास**

प्रस्तुत प्रकरणात मराठी कादंबरी लेखनाची सुरूवात ते आजतागायतचे कादंबरीचे स्वरूप, विविध प्रकार, वाटचाल व आजपर्यंत कादंबरी वाङ्मय प्रकारात झालेल्या विकासाचा विस्तृत आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : **महाराष्ट्रातील धनगर समाजाचे लोकजीवन**

या प्रकरणात महाराष्ट्र राज्यातील मेंढपाळ—धनगर समाजातील चालीरिती, रूढी, परंपरा, श्रध्दा—अंधश्रध्दांचा अभ्यास करण्यात येईल. धनगरांचा परंपरागत मेंढीपालन व्यवसाय, त्यांची भाषा, पोशाख आणि बदलत गेलेल्या लोकजीवनाचा अभ्यास करण्यात येणार आहे. धनगर समाजाची लोकगीते, ओव्या, कवने, सुंबरान, भाकणूक, हुईक, एटान आणि गजीनृत्य इत्यादी लोककलांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : **निवडक मराठी कादंब-यांत चित्रित झालेले धनगर समाजजीवन**

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या मराठी कादंबऱ्यांचा अभ्यास करून त्यात चित्रित करण्यात आलेले धनगर समाजाचे जीवन अभ्यासून त्यांच्या कौटुंबिक, सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि शैक्षणिक अधोगती व प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : **निवडक मराठी कादंब-यांची भाषाशैली**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील निवेदनाची आणि संवादाची भाषाशैली अभ्यासण्यात येणार आहे. यांमध्ये बनगरवाडी, दगा, बिरुबाचं चांगभलं, मेंढका, धनगरवाडा, का धरिला परदेस, डोंगरापल्याड आणि फेसाटी इत्यादी कादंबऱ्यांची भाषाशैली अभ्यासण्यात येईल. प्रस्तुत कादंबऱ्यांतील म्हणी, वाक्प्रचार आणि धनगरी बोलीचा विवेचक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : **निष्कर्ष आणि उपसंहार**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन कार्यासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा अभ्यास करून काढण्यात आलेले निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. निष्कर्ष आणि उपसंहार मांडून प्रस्तुत संशोधन कार्याचा समारोप करण्यात येणार आहे.

परिशिष्ट १

अ) मूळ निवडक कादंब-या :

१.	व्यंकटेश माडगूळकर	: 'बनगरवाडी', मौज प्रकाशन गृह, मुंबई, सव्विसावी आवृत्ती २०१४
२.	बाबा कदम	: 'दगा', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे, २००९ (आवृत्तीचा उल्लेख नाही.)
३.	मारुतराव वाघमोडे	: 'बिरुबाचं चांगभलं', जयमल्हार प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१८
४.	सुरेश पां. शिंदे	: 'मेंढका', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९
५.	विजयकुमार दळवी	: 'धनगरवाडा', अरिहंत पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती २०१५
६.	वसंत खारकर	: 'का धरिला परदेस', तन्मय प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती २०१८
७.	डॉ. शिवाजीराव ठोंबरे	: 'डोंगरापल्याड', अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००८
८.	नवनाथ गोरे	: 'फेसाटी', अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती २०१८

आ) संदर्भग्रंथ :

१. घोलप, दत्ता : 'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार', अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१८

२. घोंगडे, प्रा. बाळासाहेब : 'डोंगरापल्याड : स्वरूप आणि समीक्षा' (संपादित), अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४

३. चव्हाण, प्रा. रामनाथ : 'गावगाडा : काल आणि आज', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१६

४. थोरात, हरिश्चंद्र : 'कादंबरी : एक साहित्यप्रकार', शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती २०१०

५. थोरात, हरिश्चंद्र : 'मराठी कादंबरी : त्रेसष्ठ ते तेरा', शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती २०१८

६. देशमुख, डॉ. उषा मा. : 'साहित्य शोधणी', नीहारा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८९

७. धुरगुडे, धनंजय : 'माझा धनगरवाडा' (आत्मकथन), रोहन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१७

८. पाटील, प्रा.डॉ. तानाजी ज्ञा. : 'धनगरी ओवीगीतांचा चिकित्सक अभ्यास', अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४

९. पाटील, तानाजी : 'धनगरी ओवीगीतातील सांस्कृतिकता आणि भाषविशेष', अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१८

१०. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'साहित्याचे मर्म : शोध आणि बोध', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००८

११. विभुते, डॉ. शंकर : 'आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिकता', सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती २०१५

१२. शेलार, डॉ. सुधाकर : 'मराठी साहित्य : काही लेखनबंध', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१३

इ) कोश ग्रंथ :

१. 'भारतीय संस्कृति कोश', भारतीय विचार साधना ट्रस्ट, पुणे

२. 'मराठी विश्वकोश', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासन, मुंबई

स्थळ :

दिनांक : /०६/२०१९

संशोधक

केशव बालासाहेब कुकडे

(एम्.ए. (मराठी), बी.एड्., सेट, एम्.एस्सी.)
क्वॉर्टर क्र. जुने डी-८, थर्मल कॉलनी,
परळी वैजनाथ, ता. परळी, जि. बीड

मार्गदर्शक

डॉ. शिवाजी बाबुराव परळे

(एम्.ए. (मराठी), नेट, पीएच्.डी.)
साहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग,
संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी